# अमरावती महानगरपालिका,अमरावती.
## झोन क्र.2 (राजापेठ)

क्र. अमनपा/ बां.वि./झोन क्र.२/ 533 / २०२५
दिनांक:- 1 / 12 /२०२५

**कोटेशन नोटिस**

अमरावती महानगरपालिका बांधकाम विभाग झोन क्र. ०२ कार्यालय राजापेठ मार्फत प्रभाग क्र. ७ सिद्धार्थ नगर येथील जुने समाज मंदिर पाडणे व जमीन लेवल करून देणे व मलबा हटविणे. या कामाचे कोटेशन दर बंद पाकीट लिफाफा मध्ये मा.उप अभियंतायांचे नावे बांधकाम विभाग झोन क्रं २ राजापेठ महानगरपालिका , अमरावती दिनांक 02/ 12/२०२५ पासून ०७ दिवसात सादर करावे. कोटेशन सादर करतांना आपला भ्रमणध्वनि क्रमांक सविस्तर पत्ता व ई-मेल आयडी नमूद करावे.

सदर कामाकरिता क्रेन हायड्रा, कटर इत्यादि व इमारतीचे निघालेले विटा, माती साहित्य वाहून नेणारे ट्रक व मजूर याकरिता संपूर्ण व्यवस्था कोटेशन धारकांनी करावयाची आहे. महानगरपालिकेकडून कुठलीहीं मशीनरी उपलब्ध होणार नाही. तसेच मुदती नंतर आलेले कोटेशन स्वीकारले जाणार नाही.

अटी/शर्ती-

१) बांधकाम पाडण्याचे काम आपणास कार्यारंभ आदेश मिळाल्या नंतर ०७ दिवसात पूर्ण करावे लागेल.
२) साहित्य, विटा, पाईप ईत्यादि निघालेले मटेरियलची विल्हेवाट आपणास करावी लागेल.
३) इमारत पाडल्यानंतर जागा जमीन लेवल करून द्यावी लागेल.
४) इमारत बांधकाम पाडत असतांना कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी झाल्यास संपूर्ण जबाबदारी आपली राहील.
५) आधारभूत किमतीपेक्षा जे इच्छुक कंत्राटदार, इच्छुक काम करणारे धारक आधारभूत किमतीपेक्षा जास्त रक्कम देईल त्यांचे काम स्वीकृत करण्यात येईल.
६) सदर काम खाजगी तांत्रिक अभियंत्याच्या मार्गदर्शना मध्ये करावे लागेल.
७) कोटेशन त्याच दिवशी मा.उप अभियंता यांचे समक्ष उघडण्यात येईल व त्याच दिवशी शक्य झाल्यास कामाची वर्कऑर्डर देण्यात येईल.
८) बंद लिफाफ्यात सदर फॉरमेट मध्येच कोटेशन सादर करावे.
९) सदर बाबत प्रत्यक्ष जागेवर पाहणी करूनच कोटेशनचा भरणा करण्यात यावे.
१०) सदर कामाच्या अटी व शर्ती नुसार सदर काम निविदा धारकास देण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार मा. उप अभियंता यांनी राखून ठेवलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | आधारभूत किम्मत |
|---|---|---|
| १ | ~~[illegible]~~ प्रभाग क्र. ७ सिद्धार्थ नगर येथील जुने समाज मंदिर पाडणे | रु. १५,५००/- (अक्षरी- पंधरा हजार पाचसे रु फक्त) |

1/12/25

उप अभियंता
झोन क्रं २,राजापेठ
महानगरपालिका, अमरावती

प्रती,

सिस्टीम मॅनेजर,

सदर नोटिस संकेत स्थळावर प्रसिद्ध करावी.